# जिल्हाधिकारी कार्यालय,जालना

प्रशासकीय इमारत, स.नं. ४८८, जालना

(जिल्हा नियंत्रणक कक्ष)/(आपत्ती व्यवस्थापन)

दुरध्वनी क्रमांक [02482]-223132 टोल फ्री क्रमांक 1077 फॅक्स क्रमांक (02482)-226477,225326

**E-mail. rdcjalna@gmail.com, jalnaddmo@gmail.com** **Website: - www.jalna.gov.in, http://59.90.142.57/ddmajalna**


जा.क्र.२०२०/मशाका/जिनिक/आव्यप्र/कावि- दिनांक २०/०३/२०२०

**(ई-मेलने/टपालाने)**

आपत्ती प्राधान्य

**वाचाः-**

१) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.

२) फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४.

३) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिसूचना दिनांक १४/०३/२०२०.

## आदेश

ज्या अर्थी, आंतरराष्ट्रीय स्तरावर व देशांतर्गत नोव्हेल करोना विषाणू (nCoV 19) संसर्ग बाधित रुग्ण आढळत आहेत. तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरुन व देशांतर्गत विमान प्रवासाद्वारे व इतर प्रवास माध्यमाद्वारे प्रवासी भारतात विविध भागांत प्रवास करीत आहे. यामुळे संसर्ग वाढण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व विषाणूचे संसर्गात अधिक वाढ होवू नये म्हणून त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना आखणे आवश्यक आहे. तसेच सदर संशयित रुग्णांमुळे आपत्तीजनक परिस्थिती जालना जिल्ह्यात उद्भवू नये यासाठी पूर्वतयारी व प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे अगत्याचे झाले आहे.

आणि ज्याअर्थी, संदर्भ क्र.३ च्या अधिसुचने अन्वये महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र कोव्हीड १९ उपाययोजना नियम, २०२० लागू केले आहे.

या पार्श्वभूमीवर उक्त बाबी लक्षात घेता जिल्ह्यात नोव्हेल करोना विषाणू (nCoV 19) चा प्रादुर्भाव होऊ नये यादृष्टीने खबरदारीची उपाययोजना म्हणून मी, **रविंद्र बिनवडे, अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा जिल्हाधिकारी, जालना** मला आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ आणि फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये मला प्रदान केलेल्या शक्तीचा वापर करून जालना जिल्हयात सर्व मंगल कार्यालयाच्या ठिकाणी मोठया प्रमाणात गर्दी होत असते. तसेच लग्न समारंभाच्या ठिकाणी जास्त प्रमाणात नागरिक जमा होत असतात. त्यादृष्टीने जिल्हयात नोव्हेल करोना विषाणू (nCoV 19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणुन नागरिकांची एका ठिकाणी होणारी गर्दी टाळण्यासाठी जालना जिल्हयातील सर्व मंगल कार्यालय दिनांक ३१ मार्च २०२० पर्यंत बंद करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे लग्न समारंभाच्या ठिकाणी २० पेक्षा अधिक लोकास एकत्र जमण्यास याद्वारे प्रतिबंध करण्यात येत आहे.

या आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याची जबाबदारी पोलीस, महसूल व स्थानिक स्वराज्य संस्थेची राहील त्यांनी याबाबत त्यांचे यंत्रने मार्फत वेळोवेळी पाहणी करुन अहवाल सादर करावा. सदर आदेशास पोलीस अधिक्षक, जालना व जिल्हा माहिती अधिकारी, जालना यांनी व्यापक स्वरुपात प्रसिध्दी देण्यात यावी.

Rawt

**(रविंद्र बिनवडे)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जालना**
20/3/2020

**प्रत माहिती व तात्काळ आवश्यक कार्यवाहीस्तव**

१. पोलीस अधिक्षक,जालना

२. मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.जालना

३. उपविभागीय दंडाधिकारी,जालना/भोकरदन/परतूर/अंबड

४. उपविभागीय पोलीस अधिकारी,जालना/भोकरदन/परतूर/अंबड

५. सर्व तहलिसदार तथा कार्यकारी दंडाधिकारी,जालना/बदनापूर/भोकरदन/जाफ्राबाद/परतूर/मंठा/अंबड/घनसावंगी

६. सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, जालना

७. जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, जालना

८. जिल्हा माहिती अधिकारी,जालना

९. सर्व मुख्याधिकारी नगर परिषद/नगरपंचायत जि.जालना

१०.उपचिटणीस गृह शाखा, जि.अ.का. जालना

**प्रत माहितीस्तव**

१. मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

२. मा.संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय मुंबई